
RNI No:- MAHMAR/2023/86213
https://epaper.dainikvishwajagat.in



# दैनिक विश्वजगत



मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185
E-mail : dainikvishvjagato101@gmail.com
■बुलडाणा ■वाशिम ■ अकोला ■अमरावती ■यवतमाळ ■चंद्रपूर ■गडचिरोली ■परभणी ■जालना ■नाशिक ■छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■रायगड ■ठाणे ■पुणे ■सातारा
गुरुवार दिनांक 15 जानेवारी 2026 वर्ष : 4 थे अंक : 238 वा पाने : 4 किंमत : 5 रुपये

# कोणावर संक्रांत, कोणाचा पतंग तरणार ?

## महापालिकेसाठी आज मतदान; 'काटाकाटी' शिगेला,

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मुंबई- राज्यातील 29 महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीने अखेर निर्णायक टप्पा गाठला आहे. आज, गुरुवारी (दि. १५) होणाऱ्या मतदानातून राजकीय काटाकाटी होऊन शहराच्या सत्तेची दिशा ठरणार आहे. बुधवारी 'पतंगबाजी करूया रे भोऽऽ'चा गजर झाल्यानंतर आज, गुरुवारी 'मत देऊया, चला रे भोऽऽ'चा गजर होणार आहे.

आज (ता. 15) मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत असून एकूण 3 कोटी 48 लाख 79 हजार 337 मतदारांकरिता एकूण 39 हजार 92 मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात एकूण 15 हजार 908 इतके उमेदवार आहेत. तसेच पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा दि. 15 डिसेंबर 2025 रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे.मतदान आज (ता. 15) सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता सुरवात होईल. एकूण मतदारांमध्ये 1 कोटी 81 लाख 94 हजार 292 पुरुष, 1 कोटी 66 लाख 80 हजार 449 महिला; तर 4 हजार 596 इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण 39 हजार 92 मतदान केंद्रांपैकी एकूण 3 हजार 196 संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 43 हजार 958 कंट्रोल युनिट आणि 87 हजार 916 बॅलेट युनिटची



उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी 11 हजार 349 कंट्रोल युनिट आणि 22 हजार 698 बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व 28 महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व 28 महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने साधारणत: 4 मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी 3 ते 5 मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 227 प्रभाग असून यांसह सर्व महानगरपालिका मिळून 893 प्रभाग आहेत. त्यात एकूण 2 हजार 869 जागांचा समावेश आहे. त्यासाठी एकूण 15 हजार 908 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 3 अपर पोलिस अधीक्षक, 63 पोलीस उप अधीक्षक, 56 पोलीस निरीक्षक, 858 सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि 11 हजार 938 पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर एकूण 42 हजार 703 होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण 57 कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या 125 पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. 14) बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले.

### मतदान नक्की करा

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले, "महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या–महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजवायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मी सर्व मतदारांना आव्हान करतो." राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली (ता. 14) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.






१ २ ३ ४ ५ ६

# भारज येथे बारी समाजाचा मेळावा उत्साहात संपन्न !

**राजेश दामधर: दै.विश्वजगत**

जालना - जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बु येथे बारी समाज हा बहू संख्याने वास्तव्यास आहे . बारी समाज तसा कष्टाळू असून संयमी , मुत्सदी आणि शांत स्वभावाचा आहे. पूर्वज सांगतात कि , या समाजातील पूर्वीचे लोक हे अशिक्षित , अज्ञान , अंधश्रद्धा जोपसणारे होते मात्र अति प्रामाणिक आणि कष्टाळू होते . एकमेकांचा मान , मर्यादा ठेवणारे होते.

त्यानंतर पंचायत राज अस्तित्वात आल्यानंतर पहिल्यांदाच कै. तुकाराम बाबा बेराड हे भारज नगरीचे सरपंच झाले . ते शिक्षित नसले तरी चाणाक्ष आणि चौकस बुद्धीचे होते या बाबांनी समाजातील प्रतेक व्यक्तीकडून समाजाला देणगी म्हणून होईल तेव्हढा मुबलक पैसा उपलब्ध करून भारज लघू तलावा शेजारी अंदाजे शंकर एक्कर शेती विकत घेतली आणि ती शेती आता ठोका पद्धतीने देऊन समाजाच्या उत्पन्नामध्ये वाढ होत आहे बाबा कालवश झाल्यानंतर कै. गोविंदराव काका पायघन यांनी हा समाजाचा कार्यभार चोखपणे सांभाळला आणि त्यांनी प्रशस्त बारी समाज मंगल कार्यालय बांधले . आणि उद्या कायदेशीर अडचण येऊ नये म्हणून बारी समाज बहुउद्देशीय



संस्था या नावाने धर्मादाय आयुक्ताकडून नोंदणी केली . हि संस्था शेतीचे , मंगल कार्यालयाचे काम पहात आहे या संस्थेचे एकून पंधरा संचालक मंडळ आहे. आता या संस्थेचे अध्यक्ष कै. तुकाराम बाबाचे नातु श्रीमान देविदासजी सांडू बेराड हे असून उपाध्यक्ष कै. गोंविदराव काका यांचे बंधू श्रीमान तुळशिरामजी पायघन हे असून इतर संचालक मंडळ कार्यरत आहे. या समाजाचा मुख्य व्यवसाय शेती असून हे पानवेलीची जोपासना करून नागवेलीच्या पानाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतात . त्या अनुषंगाने प्रतेक वर्षीच्या मकर संक्रातीच्या दिवशी वार्षिक सवेसाधारण सभा घेऊन पूर्ण वर्षाचा हिशोब , ताळेबद , लेखाजोखा बारी समाजापुढे मांडल्या जातो. सभेच्या सुरुवातीला कै. तुकाराम बाबा बेराड यांच्या पुतळ्याला पुष्पहार श्रीफळ अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात केली जाते यावेळी भारज येथील पत्रकार तथा राजाकिय , सामाजिक कार्यकर्ते श्रीमान राजेश दौलतराव दामधर यांच्या हस्ते कै. तुकाराम बाबा बेराड यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी येथील संस्थेचे अध्यक्ष श्रीमान देविदास सांडू बेराड , उपअध्यक्ष श्रीमान तुळशिराम गणपत पायघन , विद्यमान सरपंच श्रीमान रामचंद्र आनंदा तेलंग्रे , सामाजिक कार्यकर्ते श्री काशीनाथ दामधर , विष्णू तेलंग्रे , योगेश तेलंग्रे इत्यादी समाज बांधव उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक पंचायत समितीचे सदस्य श्री नाना बोडखे यांनी केले तर श्री तुळशिराम पायघन , कैलास फुसे , विष्णू बोडखे , समाधान दामधर यांनी मनोगत व्यक्त केले तर समारोपीय भाषण श्री राजेश दामधर यांनी केले . यावेळी बारी समाजाच्या हिताचे अनेक ठराव घेण्यात आले. यावेळी गावातील बारी समाजाचे प्रमुख कार्यकर्ते तथा समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळेस फार काही किचकट प्रश्न उपस्थित न करता हा मेळावा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला आहे.

## इंडियन आर्मी डे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात - अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले.

भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात. आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या. भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भुमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे.

भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!! जय हिंद!!!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# जे. डी. चवरे विद्यामंदिराचे चित्रकला परीक्षेत नेत्रदीपक यश

### एलिमेंट्री व इंटरमिजिएट परीक्षेत 165 विद्यार्थ्यांचा सहभाग; शाळेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा मोहोर

**संजय कडोळे : दै.विश्वजगत**

कारंजा : जे. डी. चवरे विद्यामंदिर, कारंजा येथील विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक स्पर्धांमध्ये सातत्याने उज्वल यश संपादन करत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. याच परंपरेला साजेसे असे यंदाच्या चित्रकला परीक्षेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे.

चित्रकलेच्या एलिमेंट्री व इंटरमिजिएट अशा दोन स्तरांवरील परीक्षा नुकत्याच पार पडल्या. या परीक्षांना एकूण १६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी एलिमेंट्री परीक्षेत

अ श्रेणीत – २४ विद्यार्थी,
ब श्रेणीत – २१ विद्यार्थी,




क श्रेणीत – ६४ विद्यार्थी
यशस्वी ठरले.

तसेच इंटरमिजिएट परीक्षेत
अ श्रेणीत – १४ विद्यार्थी,
ब श्रेणीत – ८ विद्यार्थी,
क श्रेणीत – ३४ विद्यार्थी
यांनी उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला.

या घवघवीत यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि कला शिक्षणातील भक्कम पायाभरणीची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापक, मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या या यशामागे कलाशिक्षक श्री. बिजवे सर यांचे मार्गदर्शन, परिश्रम व सातत्यपूर्ण प्रशिक्षण मोलाचे ठरल्याने त्यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. पुढील काळातही विद्यार्थी अशाच प्रकारे विविध परीक्षांमध्ये उज्वल यश संपादन करतील, असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ येथे भूगोल दिन साजरा

**विजय जगताप: दै.विश्वजगत**

शिरवळ : रयत शिक्षण संस्थेचे, श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ येथे भूगोल विभाग व एनसीसी विभाग यांच्या विद्यमाने भूगोल दिन दिनांक 14/ 1/ 2026 रोजी ठीक 10.00 वाजता भितीपत्रक प्रकाशित करून साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम भूगोल विभागप्रमुख एनसीसी विभाग प्रमुख प्रा. डॉ. समाधान शिंदे यांनी आयोजित केला होता. हा भीतीपत्रक प्रकाशन सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्या हस्ते झाला. प्रकाशनावेळी डॉ. समाधान शिंदे म्हणाले, भूगोल म्हणजे पृथ्वी तिची रचना, भूप्रदेश, हवामान, नैसर्गिक संसाधने आदींचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. असे सांगून आजच्या दिनाचे महत्त्व, भौगोलिक वैशिष्ट्ये, त्यांनी विशद केली. या भितीपत्रक प्रकाशानावेळी प्रकाशक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने साहेब म्हणाले, बदलत्या समाजाबरोबर ऋतुमानात बदल होत आहेत. जसजसे मानवाने विकास करावयास सुरुवात केली आहे, तसतसे प्रदूषण वाढू लागलेले आहे. एनसीसी विभागातील पाच विद्यार्थ्यांची सैन्यदनात भरती झालेली आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांनी महाविद्यालयातर्फे अभिनंदन केले. या कार्यक्रमावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, प्राध्यापिका एनसीसी विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



# भाजपकडून दहिसरमध्ये 'मिक्सर' वाटप!

### काँग्रेसने जाब विचारताच पोलिसांनी घेतले ताब्यात

**प्रतिनिधी: दै.विश्वजगत**

मुंबई- महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास उरले असताना दहिसरच्या शांतीनगर जनकल्याण (वॉर्ड क्र. 3) परिसरात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. भाजप कार्यकर्त्यांकडून मतदारांना छुप्या पद्धतीने 'मिक्सर' वाटप केले जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला असून, या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनाच पोलिसांनी ताब्यात घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शांतीनगर जनकल्याण भागात भाजपच्या कार्यकर्त्यांकडून नागरिकांना प्रलोभन म्हणून मिक्सरचे वाटप केले जात असल्याची माहिती काँग्रेस कार्यकर्त्यांना मिळाली होती. या कथित प्रकाराचा पर्दाफाश करण्यासाठी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप चौबे, मुंबई युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अखिलेश यादव आणि मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस विकास पांडे हे आपल्या समर्थकांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या वाटपावर आक्षेप घेत जाब विचारण्याचा प्रयत्न केला.घटनेची माहिती मिळताच दहिसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, आचारसंहिता भंगाचा आरोप असलेल्यांवर कारवाई करण्याऐवजी पोलिसांनी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप चौबे, अखिलेश यादव आणि विकास पांडे यांनाच ताब्यात घेतले. पोलिसांच्या या भूमिकेमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे.अखिलेश यादव यांनी भाजप आणि पोलिस प्रशासनावर सडकून टीका केली. ते म्हणाले, भाजपचे पितळ उघडे पडल्यामुळेच सत्तेचा गैरवापर करून काँग्रेस कार्यकर्त्यांचा पोलिसांकडून छळ केला जात आहे. 'चोर सोडून संन्यासाला फाशी' देण्यासारखी कृती असल्याचे त्यांनी म्हटले. भाजपकडून अशा प्रकारे सत्तेचा गैरवापर करून लोकशाहीची हत्या केली जात असल्याची घणाघाती टीकाही यादव यांनी यावेळी केली.

# ठाणे महापालिका निवडणुकीच्या मतदानासाठी 2013 मतदान केंद्रे सज्ज.

**संतोष पडवळ : दै.विश्वजगत**

ठाणे : ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान उद्या (15 जानेवारी) होत आहे. निवडणुकीसाठी ठाणे महानगरपालिकेच्या 11 विभागात 2013 मतदान केंद्रे असणार आहे. या मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी 1,2 व 3, शिपाई व पोलीस नियुक्त करण्यात आले असून हे सर्व कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आले आहेत. 2013 मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर लागणाऱ्या सर्व साहित्याचे वाटप करण्यात आले असून 11 विभागातील सर्व केंद्रे मतदानासाठी सज्ज झाली असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी नमूद केले.

आज सकाळपासूनच प्रभाग क्रमांक 1,2,3,8 माजिवडा मानपाडा प्रभाग समितीतील न्यू होरायझन एज्युकेशन सोसायटी, इमारत सी, रोडाझ





सोसायटीजवळ, हिरानंदानी इस्टेट, ठाणे प, प्रभाग क्रमांक 4,5,7 वर्तकनगर प्रभाग समितीतील ज्येष्ठ कवि साहित्यिक स्व. बाबूराव सरनाईक जिम्नॅशियम सेंटर, बेथनी हॉस्पिटलजवळ, पोखरण रोड नं. 2 ठाणे, प्रभाग क्रमांक 6,13,14,15 लोकमान्य सावरकर प्रभाग समितीतील महिला बचत गट भवन, कोरस हॉस्पिटलजवळ, ठाणे प, प्रभाग क्रमांक 16,17,18 वागळे इस्टेट प्रभागसमितीतील शासकीय तंत्रनिकेतन, वागळे इस्टेट, ठाणे (प.), प्रभाग क्र. 19,20,21,22 नौपाडा कोपरी प्रभाग समितीतील विद्या प्रसारक मंडळाचे पॉलिटेक्निकल कॉलेजची इमारत, ठाणा कॉलेज, तळमजला ठाणे, प्रभाग क्र. 10,11,12 उथळसर प्रभाग समितीतील होली क्रॉस हायस्कूल हॉल, के.व्हीला, ठाणे, प्रभाग क्र. 9,23,24,25 कळवा प्रभाग समितीतील सह्याद्री हायस्कूल, 4 था मजला, कळवा प, प्रभाग क्रमांक 26,31 मुंब्रा प्रभाग समितीतील मौलाना अबुल कलाम स्टेडियम, कौसा, बॅटमिंटन हॉल, तळमजला, मुंब्रा, प्रभाग क्रमांक 30, 32 मुंब्रा प्रभाग समितीतील मौलाना अब्दुल कलाम स्टेडियम, कौसा, पहिला मजला, मुंब्रा, प्रभाग क्रमांक 27,28 दिवा प्रभाग समितीतील मौलाना अब्दुल कलाम स्टेडियम, कौसा, प्रेक्षक गॅलरी, तळ मजला + प्रेक्षक गॅलरीची मागील बाजू (पहिला मजला) दक्षिण बाजूकडील सात गाळे, मुंब्रा प्रभाग क्रमांक 29,33 दिवा प्रभाग समितीतील मौलाना अब्दुल कलाम स्टेडियम, कौसा, प्रेक्षक गॅलरी, तळ मजला + प्रेक्षक गॅलरीची मागील बाजू (पहिला मजला) उत्तर बाजूकडील सात गाळे, मुंब्रा याठिकाणी त्या त्या विभागात असलेल्या मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

उद्या (15 जानेवारी 2026) सकाळी 6.00 वा सर्व मतदान केंद्रावर उमेदवारांच्या प्रतिनिधीसमक्ष मॉकपोल घेण्यात येणार असून त्यानंतर सकाळी ठीक 7.30 वा. प्रत्यक्ष मतदानाला सुरूवात होणार आहे. मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून ठाणेकर नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने आपला मतदानाचा अधिकार बजावावा असे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जालना- ते -वाशिम नवीन रेल्वेलाईनच्या मार्गासाठी जिजाऊ सृष्टीच्या हेलीपॅडवर नानासाहेब तौर फांऊनडेशनचे संचालक, नानाभाऊ तौर व गजाननभाऊ दराडे यांच्या वतीने पालकमंत्री मकरंद पाटील/जाधव यांच्या कडे मागणी

**अनिल दराडे : दै.विश्वजगत**

सिंदखेड राजा - राष्ट्रमाता जिजाऊ मात जन्मोत्सवाच्या निमित्ताने मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान नानासाहेब फाउंडेशनच्या वतीने माननीय बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार मकरंद आबा पाटील/जाधव मदत व पुर्नवसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांना हेलीपॅडवर निवेदन देण्यात आले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते गजानन भाऊ दराडे आणि नानासाहेब तौर यांच्या हस्ते सादर करण्यात आलेल्या या निवेदनात राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या नावाने जालना–ते---वाशिम (सिंदखेडराजा,लोणार सरोवर, लोणी, रिसोड, वाशिम )अशी नवीन रेल्वे लाईन मार्ग निर्माण करण्याची मागणी करण्यात आली आहे.व हा नविन रेल्वे लाईन मार्ग जालना–सिंदखेडराजा–दुसरबीड–लोणार सरोवर–लोणी–वाशिम असा सुमारे १५० कि.मी. लांबीचा प्रस्तावित रेल्वे मार्ग असुन जनसामान्यांच्या विकासासाठी किती महत्वाचा आणि किती लाभदायक असुन अत्यंत महत्त्वाचा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या रेल्वे मार्गासाठी गेल्या पाच वर्षांपासून नानासाहेब तौर फांऊनडेशनच्या वतीने महाराष्ट्र शासन दरबारी पाठपुरावा सतत सुरू असून, जन आंदोलन समितीच्या माध्यमातून ही मागणी अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. तसेच हा रेल्वे मार्ग मराठवाडा व विदर्भाच्या विकासाला चालना देणारा ठरणारा असुन, दोन सांस्कृतिक व ऐतिहासिक शहरांची नाळ जोडणारा व नवपर्यटन निर्माण करणारा आहे तसेच ( जिजाऊंच्या सिंदखेडराजाचे वैभव व संभाजी नगराच्या देवगिरी किल्ला व वेरूळ लेणीच्या वैभवात व जालन्याच्या स्टिल सिटी व सिड हब व ड्राय पोर्टेबिलिटीसाठी ) अत्यंत महत्त्वाचा व नवी ओळख निर्माण करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल असेही नमूद करण्यात आले. करीता पालकमंत्री ना. मकरंद आबा पाटील यांनी निवेदन स्विकारून सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. व लवकरात लवकर हा रेल्वे मार्ग आपण महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन या महत्वाकांक्षी योजनेत समाविष्ट करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव मांडून लवकर मंजुरी घेऊन राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या दूरदृष्टीच्या विचाराला समर्पित करू या,अशी ग्वाही दिली, त्यावेळी उपस्थितांमध्ये सिंदखेड राजा मतदारसंघाचे लोकप्रिय तरूण तडफदार व नवयुवकाचे आयडॉल,आमदार मा. मनोजभाऊ कायंदे ,रा. कॉ. पा. जिल्हा अध्यक्ष बुलढाणा,व रा कॉ पा. अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष,ॲड. नाझेर काझी, नगराध्यक्ष सौ. माधुरीताई शिपणे दे. राजा ,माजी नगराध्यक्ष देविदासभाऊ ठाकरे सि. राजा, श्यामभाऊ मेहेत्रे गटनेते सि राजा,रा. कॉ. पा.तालूका अध्यक्ष,सिध्दुभाऊ जाधव, नानासाहेब तौर फाऊंडेशनचे उपाध्यक्ष व भा.ज.पा .तालुका उपाध्यक्ष सुरेशभाऊ बुलकडे दुसरबीड, प्रा.दिलीप नाईकवाड सर ,पत्रकार गजाननभाऊ सोनुने तसेच इतर सामाजिक संस्थेचे अनेक सामाजिक कार्यकर्ते, सर्व दैनिक पत्राचे पत्रकारबंधु व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213

विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटींग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

**महत्त्वाचे**

## मोलाचा सल्ला ...!

मिळालंच सुख तर उपभोगायच
ते मिरवत नाही बसायचं
झालंच दुःख तर पचवायच
ते गिरवत नाही बसायचं
आल्याच अडचणी तर लढायचं
पळून अजिबात नाही जायचं
मिळालंच प्रेम तर जवळ जायचं
त्याचा हिशोब नाही मांडत बसायच
दिलंच आहे जीवन तर जगायच
उगाच दिवस नाही ढकलंत बसायच
सुखासाठी धडपड हवी पण
त्या सुखाला
कुठेतरी समाधानाची सीमा असावी

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40



# कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयाचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दबदबा

**अजय टप : दैनिक विश्वजगत**

मलकापूर : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकतीच उन्हाळी २०२५ बी.ई. परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर केली असून, या गुणवत्ता यादीत पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. या गुणवत्ता यादीत यांत्रिक अभियांत्रिकी अंतिम वर्ष बी.ई. परीक्षेत महाविद्यालयाचा विद्यार्थी गौरव प्रदीप झांबरे यांनी विद्यापीठ गुणवत्ता क्रमांक ७ पटकावत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्याचप्रमाणे विद्युत अभियांत्रिकी अंतिम वर्ष बी.ई. परीक्षेत विद्यार्थी स्वप्निल सुनील तायडे यांनी विद्यापीठ गुणवत्ता क्रमांक ५ मिळवून महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली आहे.

विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली व प्रामाणिक प्रयत्नांचे फलित असून, हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण महाविद्यालयासाठी गौरवास्पद असल्याचे मत शैक्षणिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री. ज्ञानदेव पाटील, सचिव डॉ. अरविंद कोलते व खजिनदार श्री. सुधीर पाचपांडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, "विद्यार्थ्यांचे हे यश महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धती, अनुभवी प्राध्यापकवर्ग व शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणाचे फलित आहे." यावेळी प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे यांनीही विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच महाविद्यालयाचे आयक्यूएसी अधिकारी प्रा. रमाकांत चौधरी यांनी गुणवत्ता आधारित शिक्षण, सातत्यपूर्ण मूल्यमापन व शैक्षणिक सुधारणा यांचा विद्यार्थ्यांच्या यशात मोठा वाटा असल्याचे नमूद केले. विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. योगेश सुशीर व यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. संतोष शेकोकर यांनी संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत व पालकांचा पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाल्याचे स्पष्ट केले. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून, भविष्यातही विद्यापीठ स्तरावर अधिकाधिक गुणवत्ता प्राप्त करण्याचा निर्धार महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# नायलॉन मांजाने गळा चिरला! खामगावात दुचाकीस्वार युवकाचा जीव थोडक्यात बचावला

### जलंब नाक्यावर सकाळी घडली धक्कादायक घटना; बंदी असूनही नायलॉन मांजाची चोरीछुपी विक्री सुरू

**प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत**

खामगाव : नायलॉन मांजाच्या घातक वापरामुळे आणखी एक निष्पाप जीव धोक्यात आला असून, खामगाव शहरातील जलंब नाक्यावर मंगळवारी सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास दुचाकीस्वार युवकाचा गळा नायलॉन मांजामुळे चिरल्याची धक्कादायक घटना घडली. रस्त्यावरून दुचाकीने जात असताना अचानक नायलॉन मांजा युवकाच्या गळ्याला अडकला, त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. ऋषभ राजेंद्र राजपूत (वय २५) असे जखमी युवकाचे नाव असून,



घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी प्रसंगावधान दाखवत तातडीने मदत केली. जखमी युवकास उपचारासाठी डॉक्टर भगतसिंग राजपूत यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे युवकाचा जीव वाचला असून, सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शासनाने नायलॉन मांजावर कडक बंदी घातलेली असतानाही शहरात चोरीछुप्या मार्गाने या घातक मांजाची विक्री सुरू असल्याचे या घटनेमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. नायलॉन मांजामुळे यापूर्वीही अनेक वेळा पक्षी, पादचारी तसेच दुचाकीस्वार जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, संबंधित विक्रेत्यांवर ठोस व कठोर कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.




ठाणे : दिव्यात विकास इंगळे यांनी दिवा शहरातील सत्य परिस्थिती दाखवून कोणत्याही अमिषाला बळी न पडता केली मतदारांमध्ये जनजागृती करून आपले अमूल्य मत देण्याचे आवाहन केले. दिव्यातील अपूर्ण विकासकामे, पायाभूत सुविधांचा अभाव, वाढती महागाई, बेरोजगारी व नागरी प्रश्न यांची व्यथा मांडून आपण आपला नगरसेवक निवडा असे सांगितले.
( फोटो – संतोष पडवळ )

# दिव्यातील गणेश विद्यामंदिर शाळेकडून विद्यार्थ्यां व पालकांची लूट - अमोल केंद्रे.

**संतोष पडवळ : दैनिक विश्वजगत**

ठाणे : दिवा दातीवली येथील गणेश विद्यामंदिर मराठी माध्यम शाळा १००% अनुदानित असून सदर शाळा फी, डोनेशन घेऊ शकत नाही तसेच विद्यार्थ्यांना बुक्स देखील मोफत मिळणे अपेक्षित आहे परंतु शाळा प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण न देता त्यांची फसवून होत असल्याचे समाजसेवक अमोल केंद्रे यांनी स्पष्ट केले आहे. अनेक वर्षांपासून विद्यार्थी व पालकांची लूट करत असल्याचे उघड केले असून याबाबत शिक्षण अधिकारी यांच्या कडे केंद्रे यांनी तक्रार केली आहे. तसेच दिवा शहरातील इतर ज्या खाजगी शाळा अनुदान घेतात पण विद्यार्थ्यांना सवलत देत नाहीत त्यांच्या विषयी देखील माहिती घेण्यात येत आहे. आश्चर्य म्हणजे एवढे वर्ष गणेश विद्यामंदिर शाळा विद्यार्थ्यांची पालकांची फसवणूक करत असताना देखील कोणत्याही नेत्यांनी यावर आवाज उठवला का नाही? शासकीय अधिकारी देखील गप्प का होते. कोण आहे या सर्व गोष्टी घडत असताना शालेय प्रशासनाच्या मागे उभा असणारा आका ? आत्ता पर्यंत हजारो विद्यार्थ्यांना करोडो रुपयांनी गंडा घालणाऱ्या गणेश विद्यामंदिर शालेय प्रशासनास कायदेशीर उत्तर देण्यात येणार असून इतरही शाळांची चौकशी करून फी स्ट्रक्चर, डोनेशन, शाळेचे ऑडिट सर्वांची




माहिती घेण्यात येणार आहे असे केंद्रे म्हणाले आहे. दिवा शहरातील हजारो विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे असे समाजसेवक श्री अमोल धनराज केंद्रे यांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यां आणि पालकांनाही जागृत होणे गरजेचे आहे. त्यासाठी या वर्षी शिक्षण घेत असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांनी फी, डोनेशन, पुस्तकांचे पैसे भरू नयेत. शालेय प्रशासन जबरदस्ती करत असेल तर शिक्षणाधिकारी ठाणे महानगर पालिका यांना लेखी तक्रार करावी. त्याची एक प्रत अमोल धनराज केंद्रे यांच्याकडे द्यावी. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळवून देण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांच्या सोबत आहोत. वेळ पडली तर रस्त्यावर उतरू न्यायालयात जाऊ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळवून देऊ तो विद्यार्थ्यांचा अधिकार आहे असे अमोल केंद्रे यांनी स्पष्ट केले आहे.



# समर्थ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनुभवले नवनवीन कृषी तंत्रज्ञान

**अनिल दराडे : दैनिक विश्वजगत**



सिंदखेडराजा -डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा तर्फे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये कलश सीड्स प्रा. लिमिटेड, ईश्वेद टिशू कल्चर लॅब आणि मातृतीर्थ, सिंदखेड राजा या ठिकाणांचा समावेश होता. कलश सीड्स ,जालना येथे आयोजित अत्याधुनिक पीक प्रदर्शनाचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला. या प्रदर्शनामध्ये भाजीपाल्याच्या विविध संकरित वाणांची प्रभावी श्रेणी सादर करण्यात आली होती. प्रति झाड उत्कृष्ट फळधारणा दिसून येत असून, व्यावसायिक उत्पादनाच्या दृष्टीने या वाणांची मोठी क्षमता असल्याचे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहायला मिळाले. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ कशी होऊ शकते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. यावेळी कलश सीडचे ढोबळी मिरची टोमॅटो उत्कृष्ट वाणाचे निर्माते गणेश कंकाळ व टोमॅटोच्या उत्कृष्ट वाणाचे निर्माते सचिन बनकर यांनी विद्यार्थ्यांना मौल्यवान माहिती दिली. फिल्ड भेटीदरम्यान कंपनीच्या आंतरराष्ट्रीय बियाणे बाजारातील उपक्रमांचे नेतृत्व करणारे विवेक पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना जागतिक संधींबाबत मार्गदर्शन केले. कलश सीडचे संचालक समीर अग्रवाल व त्यांच्या टीमनेही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.ईश्वेद टिशू कल्चर लॅबमध्ये विद्यार्थ्यांना केळी,बांबू व खजूर याबद्दल टिशू कल्चर तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. येथे टिशू कल्चरच्या विविध प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. ईश्वेद बायोटेकचे डायरेक्टर संजय वायाळ व अक्षय वायाळ त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक दृष्टीने मोलाचे मार्गदर्शन केले.

सहलीच्या शेवटी मातृतीर्थ, सिंदखेड राजा येथे विकास ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या जिजाऊ सृष्टी व राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी असलेल्या राजवाड्या बद्दल माहिती दिली.या शैक्षणिक सहलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, प्रा. योगेश चगदळे व प्रा. गणेश घुगे व १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, उद्योगविश्व आणि सांस्कृतिक वारसा यांचा समन्वित अनुभव मिळाला.



# मुस्लिम बहुल वस्तीला जोडणाऱ्या रस्त्यावर बेशिस्त वाहन पार्किंग व अतिक्रमणबाबत कारवाईची मागणी

**अजय टप : दैनिक विश्वजगत**

मलकापूर:तहसील चौक ते पारपेठ भागाला जोडणाऱ्या रस्तावर व उडडाण पुलावर बेशिस्त वाहन पार्कींग व अतिक्रमणामुळे पारपेट भागातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने असगर कुरैशी व जफर खान यांच्या नेतृत्वात सदर रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवावे व बेशिस्त वाहन पार्किंग वर कारवाई करावी या मागणीसाठी दिनांक 14 जानेवारी 2026 रोजी मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन,ठाणेदार गणेश गिरी, मुखाधिकारी संजय केदार यांना अन्यायग्रस्त जनतेचे व्यासपीठ या संघटनेच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.यावेळी इमरान लकी,मुबाशिर भाई,उर्फ बबलू,इमरान शेख,सुलेमान खान,सत्तार शाह या मुस्लिम सामाजिक घटकांनी महत्वपूर्ण पुढाकार घेतला होता.



निवेदनात म्हटले आहे की,परिसरात जि.प.शाळा,क्रीडा संकुल,रेल्वे स्टेशन,



मार्गावर आहेत.त्याचमुळे हा रस्ता वर्दळीचा असल्याचे बहुदा दिसून येते.गेल्या काही दिवसापूर्वीच शाळकरी अल्पवयीन विद्यार्थिनींच्या अपहरण,एका अज्ञात टिप्पर कडून एकाची तर दुसऱ्या एका म्हाताऱ्याची याच परिसरात अपघातात मृत्यू झाल्याची घटना लक्षात घेता. तात्काळ कायमस्वरूपी उपाय योजना म्हणून तात्काळ मुक्ताईनगर रोडवर बेशिस्तपणे उभे राहणारे मोठे अवजड वाहने हटवणे व कारवाई करणे,चारखंबा चौक ते वल्ली चौक परिसरात अवैध लाकूड साठा जप्त करून रस्ता मोकळा करणे,वल्ली चौक पारपेठला जोडणाऱ्या उड्डाण पुलावरील अतिक्रमण हटवून मागण्यांचे स्वागत करत तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन देण्याची प्रशासनाची भूमिका स्वागतार्ह ठरली. यावेळी संघटनेचे ॲड कृष्णा मेसरे,स्वप्नील आकोटकर,अमोल टप,पप्पू ठाकूर,प्रदिप इंगळे,रोहित डाके संजय तिवारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक विश्वजगत
RNI No:- MAHMAR/2023/86213
https://epaper.dainikvishwajagat.in
मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185
E-mail : dainikvishvjagato101@gmail.com
गुरुवार दिनांक 15 जानेवारी 2026




## पक्ष, संघटना, नेते सगळं बाजूला ठेवा...

# आता फक्त संघर्ष!

## 21 जानेवारीला मुंबई नाही गाठली, तर इतिहास आपल्याला माफ करणार नाही

समाज बांधवांनो,
हा लेख विनवणीसाठी नाही...
हा लेख समजावणीसाठी नाही...
हा लेख सौम्य शब्दांत लिहिलेला नाही...
हा लेख आहे अस्वस्थतेचा,
हा लेख आहे रागाचा,
हा लेख आहे जखमी अस्मितेचा,
आणि हा लेख आहे झोपलेल्या समाजाला जागं करण्याचा!
कालपासून सोशल मीडियावर फिरणारा
एक साधा, पण काळजाला चिरणारा
व्हिडिओ पाहिलात का?
दोन मेंढपाळ बांधव...
त्यांच्यासोबत मेंढ्यांचा कळप...
ना गाडी, ना बंगला, ना एसी, ना मोबाईल भाषण...
फक्त पायात चप्पल, अंगावर कपडे
आणि डोळ्यांत हक्काची आग!
पत्रकार विचारतो —
"बाबांनो, कुठे निघालात?"
उत्तर काय येतं?
"आमच्या हक्काच्या आरक्षणासाठी...
ST आरक्षणाच्या लढ्यासाठी...
आझाद मैदान, मुंबईकडे!"
समाज बांधवांनो,
या एका उत्तरात जेवढा इतिहास आहे,
तेवढा इतिहास आपल्या हजार भाषणांत नाही!
खरा प्रश्न असा आहे —आपण कुठे आहोत?
ज्या मेंढपाळांच्या कष्टावर,
ज्या मेंढपाळांच्या भटक्या आयुष्यावर,
ज्या मेंढपाळांच्या घामावर
आपल्याला NT आरक्षण मिळालं,
तेच मेंढपाळ आजही जंगलात, डोंगरात,
रानावनात भटकत आहेत.

आणि आपण?
आपण गावात स्थिर आहोत...
घरं बांधली...
शेती केली...
नोकऱ्या केल्या...
व्यवसाय केले...
आरक्षणाचा फायदा घेतला...
पण आज जेव्हा ST आरक्षणाचा
निर्णायक लढा उभा राहिला,
तेव्हा आपण कुठे आहोत?
फेसबुकवर पोस्ट?
WhatsApp वर फॉरवर्ड?
की चहाच्या टपरीवर चर्चा?
ज्यांना सगळ्यात जास्त लढायचं कारण आहे,
तेच सगळ्यात पुढे आहेत!
१२ महिने भटकणारा मेंढपाळ,
ऊन–पाऊस, वाघ–डुक्कर,
पोलिसांची हकालपट्टी,
वनविभागाचा त्रास सहन करणारा मेंढपाळ,
आज मेंढ्यांसह मुंबईकडे निघतो...
आणि आपण?
आरक्षणाचा फायदा घेऊनही
सोफ्यावर बसून "पाहूया काय होतं"
म्हणतो?
लाज वाटली पाहिजे!
खूप लाज वाटली पाहिजे!
हा लढा

कुणासाठी आहे?
हा लढा दीपक भाऊ बोराडेंसाठी नाही.
हा लढा कोणत्या संघटनेच्या झेंड्यासाठी नाही.
हा लढा कुठल्या पक्षाच्या बॅनरसाठी नाही.
हा लढा आहे —
आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी!
आपल्या अस्मितेसाठी!
आपल्या न्यायासाठी!
आज नाही लढलो,
तर उद्या




आपल्या मुलांना
विचारायला
लागेल —
"बाबा, तेव्हा तुम्ही काय करत होतात?"
तेव्हा उत्तर काय देणार?
इतिहास मूक समाजाला कधीच न्याय देत नाही

इतिहासात एक गोष्ट स्पष्ट आहे —
जो समाज रस्त्यावर उतरतो,
त्यालाच हक्क मिळतात!
आरक्षण हे कुणी दान म्हणून दिलेलं नाही.
ते रक्त, घाम आणि बलिदानातून मिळालं आहे.
आज ST आरक्षणाचा क्षण निर्णायक आहे.
आज मागे पडलो,
तर पुढची पिढी आपल्याला दोष देईल.
पक्ष, नेते, संघटना —सगळं चुलीत घाला!
आज जर तुम्ही म्हणत असाल —
"हा अमुक नेत्याचा कार्यक्रम आहे"
"ती अमुक संघटनेची हाक आहे"
तर लक्षात ठेवा —
आरक्षण कुण्या एका नेत्याच्या नावावर नाही,
ते संपूर्ण समाजाच्या नावावर आहे!
आज फक्त एकच
ओळख ठेवा —
मी धनगर आहे!
मी माझ्या हक्कासाठी
लढतोय!
२१ जानेवारी —
फक्त तारीख
नाही, ती कसोटी
आहे
२१ जानेवारी
म्हणजे पिकनिक
नाही.
२१ जानेवारी म्हणजे
सहल नाही.
२१ जानेवारी म्हणजे फोटो काढण्याचा कार्यक्रम नाही.
२१ जानेवारी म्हणजे —
आपण समाज म्हणून जिवंत आहोत की मेलो आहोत, याची कसोटी!
जर त्या दिवशी
मेंढपाळ मेंढ्यांसह आझाद मैदानात
असतील
आणि आपण गावात टीव्ही पाहत बसलो

असू,
तर इतिहास एकच निकाल देईल —
हा समाज लढायला अपयशी ठरला!
आता वेळ संपत चालली आहे
आज नाही तर कधी?
आता नाही तर कोण?
आज जर आपण एकत्र आलो नाही,
तर पुन्हा संधी मिळेल याची हमी नाही.
मेंढपाळ चालले आहेत...
नंगे पाय...
मेंढ्यांसह...
आणि आपण अजूनही विचार करतोय?
शेवटचं स्पष्ट आवाहन
समाज बांधवांनो,
हे शेवटचं आणि थेट सांगतो —
घरात बसू नका
कारणं देऊ नका
नेत्यांची वाट पाहू नका
संघटनांच्या भांडणात अडकू नका
२१ जानेवारीला मुंबई गाठा!
आझाद मैदान गाठा!
संख्येने, ताकदीने, एकजुटीने उभे राहा!
मेंढपाळ बांधवांच्या डोळ्यांत डोके घालून उभं राहण्याची हिंमत दाखवा!
नाहीतर लक्षात ठेवा —
इतिहास लढणाऱ्यांची नावं लिहितो...
बसून पाहणाऱ्यांची नाही!
जय संघर्ष!
जय एकजूट!
२१ जानेवारी —मुंबईच उत्तर आहे!
चला मुंबई....



**गजानन काटे**
मुख्य संपादक, दैनिक विश्वजगत
मिडिया प्रभारी, महाराष्ट्र, विदर्भ प्रभारी
**ऑल इंडिया धनगर समाज महासभा**
मो. 9096873185



